सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

**MAHARASHTRA ACT No. XX OF 2013**

# Maharashtra Unauthorized Institutions and Unauthorized Courses of Study in Agriculture, Animal and Fishery Sciences, Health Sciences, Higher, Technical and Vocational Education (Prohibition) Act, 2013

***(As modified upto the 26th January, 2016)***

व्यवस्थापक , येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित केले.

२०१५

[ किंमत : २२ रुपये ]

वि (जे) ६७१

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

# महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३

## अनुक्रमणिका


उद्देशिका — पृष्ठ

कलमे — क्रमांक

**प्रकरण एक**

**प्रारंभिक**

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | ... १ |
| २. | व्याख्या. | ... १ |

**प्रकरण दोन**

**अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई**

| | | |
|---|---|---|
| ३. | अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई. | ... ५ |
| ४. | विवक्षित जाहिरातींना मनाई. | ... ५ |

**प्रकरण तीन**

**प्राधिकारी**

| | | |
|---|---|---|
| ५. | सक्षम प्राधिकारी. | ... ५ |
| ६. | सक्षम प्राधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये. | ... ६ |
| ७. | अपील प्राधिकारी. | ... ६ |
| ८. | अपील. | ... ६ |

**प्रकरण चार**

**अपराध व शास्ती**

| | | |
|---|---|---|
| ९. | अपराध. | ... ७ |
| १०. | शिक्षा. | ... ७ |
| ११. | कंपन्यांनी केलेले अपराध. | ... ७ |

## अनुक्रमणिका--चालू

| उद्देशिका कलमे | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|

**प्रकरण पाच**

**संकीर्ण**


| | | |
|---|---|---|
| १२. | सक्षम प्राधिकारी व अपील प्राधिकारी यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. ... | ८ |
| १३. | शिक्षण संस्था, अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांसाठी जाहिरात संहिता असणे. ... | ८ |
| १४. | जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे शास्ती वसूल करणे. ... | ९ |
| १५. | प्रमाणपत्र पाठ्यक्रमांबाबतची व्यावृत्ती. ... | ९ |
| १६. | सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण. ... | ९ |
| १७. | सक्षम प्राधिकारी इत्यादी हे लोकसेवक असणे. ... | १० |
| १८. | नियम करण्याचा अधिकार. ... | १० |
| १९. | हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला पूरक असेल परंतु न्यूनकारी ठरणार नाही. ... | १० |
| २०. | अडचण दूर करण्याचा अधिकार. ... | १० |
| २१. | २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती. ... | ११ |

# सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

## महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३

[मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २१ ऑगस्ट २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणाऱ्या आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करणाऱ्या किंवा चालवणाऱ्या व्यक्तींना प्रभावीपणे मनाई करण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि म्हणून त्यांनी दिनांक ११ जुलै २०१३ रोजी, महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, २०१३ हा, प्रख्यापित केला होता ; (२०१३ चा महा. अध्या.१३.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ११ जुलै २०१३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

१९८३ चा महा. ४१.

(क) ''कृषि शिक्षण'' याचा अर्थ, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ याच्या कलम २ च्या खंड (ब) च्या अर्थांतर्गत 'कृषि' याच्याशी संबंधित असणारे शिक्षण असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने कृषि शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांचा समावेश होईल ;

(ख) ''कृषि शिक्षण संस्था'' याचा अर्थ, कृषि शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही ;

(ग) ''पशु व मत्स्य विज्ञान शिक्षण'' याचा अर्थ, महाराष्ट्र पशु आणि मत्स्यव्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याच्या कलम २ च्या खंड (१७) च्या अर्थांतर्गत पशु व मत्स्य विज्ञान यामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने पशु व मत्स्य विज्ञान शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांचा समावेश होईल ; १९९८ चा महा. १७.

(घ) ''पशु व मत्स्य विज्ञान शिक्षण संस्था'' याचा अर्थ, पशु व मत्स्य विज्ञान शिक्षण यामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे. परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही ;

(ङ) ''अपील प्राधिकारी'' याचा अर्थ, कलम ७ अन्वये नियुक्त केलेला अपील प्राधिकारी असा आहे ;

(च) ''समुचित प्राधिकरण'' याचा अर्थ, —

(एक) भारतीय शुश्रूषा परिषद अधिनियम, १९४७, १९४७ चा ४८.

(दोन) दंतवैद्यक अधिनियम, १९४८, १९४८ चा १६.

(तीन) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६, १९५६ चा १०२.

(चार) भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम, १९७०, १९७० चा ४८.

(पाच) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८५, १९८५ चा ५०.

(सहा) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अधिनियम, १९८७, १९८७ चा ५२.

(सात) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद अधिनियम, १९९३, १९९३ चा ७३.

(आठ) महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ अन्वये घटित केलेले कृषि विद्यापीठ, १९८३ चा महा. ४१.

(नऊ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९, १९८९ चा महा. २०.

(दहा) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ अन्वये घटित केलेले विद्यापीठ, १९९४ चा महा. ३५.

१९९७ चा महा. ३८. (अकरा) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७,

१९९८ चा महा. १७. (बारा) महाराष्ट्र पशु आणि मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, किंवा

१९९९ चा महा. १०. (तेरा) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८,

यांद्वारे किंवा तद्न्वये स्थापन केलेले कोणतेही प्राधिकरण, असा आहे आणि तसेच, त्यामध्ये, भारत सरकारच्या कामगार मंत्रालयाने स्थापन केलेली राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, आणि शासनाने स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ आणि कोणत्याही अध्ययनक्रमाच्या किंवा अभ्यास पाठ्यक्रमाच्या बाबतीत शासनाकडून समुचित प्राधिकारी म्हणून अधिसूचित करण्यात येईल असा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांचा समावेश होईल ;

(छ) "प्रमाणपत्र पाठ्यक्रम" याचा अर्थ, आरोग्य विज्ञान यामधील अध्ययनक्रमाच्या किंवा अभ्यास पाठ्यक्रमाच्या संबंधातील अर्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याअन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने रचना केलेल्या अध्ययनक्रम किंवा स्वयंरचित अभ्यास पाठ्यक्रम असा आहे ; आणि एखाद्या शिक्षण संस्थेच्या अन्य कोणत्याही अध्ययनक्रमाच्या किंवा अभ्यास पाठ्यक्रमाच्या संबंधातील अर्थ, एका वर्षापेक्षा कमी मुदतीचा अध्ययनक्रम किंवा पाठ्यक्रम, असा आहे ;

१९९९ चा महा. १०.

(ज) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त करण्यात आलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे ;

(झ) "शिक्षण संस्था" याचा अर्थ, कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, तंत्र शिक्षण किंवा यथास्थिति, व्यवसाय शिक्षण यामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम चालवणारी संस्था, असा आहे ;

(ञ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

१९९९ चा महा. १०. (ट) "आरोग्य विज्ञान" याचा अर्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याच्या कलम २ च्या खंड (१७) च्या अर्थांतर्गत आरोग्य विज्ञान यामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम किंवा संशोधन असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने आरोग्य विज्ञानातील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांचा समावेश होईल ;

(ठ) "आरोग्य विज्ञान शिक्षण संस्था" याचा अर्थ, आरोग्य विज्ञानामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे. परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही ;

(ड) "उच्च शिक्षण" याचा अर्थ, कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा आणि व्यवस्थापन यांसारख्या उच्च शिक्षणामधील अध्ययनक्रम, अभ्यास पाठ्यक्रम किंवा संशोधन व प्रशिक्षण, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने उच्च शिक्षणामधील अध्ययनक्रम, अभ्यास पाठ्यक्रम किंवा ज्ञानक्षेत्रे म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम, अभ्यास पाठ्यक्रम किंवा यथास्थिति, ज्ञानक्षेत्रे यांचा समावेश होईल ;

(ढ) "उच्च शिक्षण संस्था" याचा अर्थ, उच्च शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे. परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही ;

(ण) "औद्योगिक प्रशिक्षण" याचा अर्थ, ज्याद्वारे विविध उद्योगांमधील क्षेत्रीय गरजेनुसार कार्यबल निर्माण करील असे प्रशिक्षण, असा आहे ;

(त) "औद्योगिक प्रशिक्षण संस्था व औद्योगिक प्रशिक्षण केंद्र" याचा अर्थ, ज्यांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण दिले जाते आणि ज्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, भारत सरकार, कामगार मंत्रालय यांनी मान्यता दिलेली आहे, अशा संस्था किंवा केंद्रे असा आहे ;

(थ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांन्वये विहित केलेले, असा आहे ;

(द) "तंत्र शिक्षण" याचा अर्थ, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वास्तुशास्त्र, नगररचना, औषधनिर्माणशास्त्र आणि उपयोजित कला व हस्तव्यवसाय यांसारख्या शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम व संशोधन आणि प्रशिक्षण, असा आहे आणि त्यामध्ये, भारत सरकारने तंत्र शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांचा समावेश होईल ;

(ध) "तंत्र शिक्षण संस्था" याचा अर्थ, तंत्र शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे. परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही ;

(न) "अनधिकृत पाठ्यक्रम" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने मान्यता न दिलेले अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम, असा आहे ;

(प) "अनधिकृत संस्था" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय चालविण्यात येणारी शिक्षण संस्था, असा आहे ;

(फ) "व्यवसाय शिक्षण" याचा अर्थ, रोजगार किंवा स्वयं-रोजगार निर्मितीसाठी ज्याद्वारे अभियांत्रिकी, निम-आरोग्य विज्ञान, वाणिज्य, कृषि, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय व पशुवैद्यक या क्षेत्रांमधील ज्ञान दिले जाते व कौशल्य विकसित केले जाते असे अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने व्यावसायिक शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम म्हणून घोषित केलेल्या अन्य अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांचा समावेश होईल ;

(ब) ''व्यवसाय शिक्षण संस्था'' याचा अर्थ, व्यवसाय शिक्षणामधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम प्रस्तुत करणारी संस्था, असा आहे. परंतु, त्यामध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये स्थापन झालेल्या कोणत्याही विद्यापीठाचा समावेश होणार नाही.

## प्रकरण दोन

## अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई

अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई.

**३.** (१) कोणतीही व्यक्ती, समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, शिक्षण संस्था स्थापन करणार नाही किंवा स्थापन करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा चालविणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती किंवा शिक्षण संस्था, समुचित प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेशिवाय, कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण किंवा व्यवसाय शिक्षण यांमधील अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम सुरू करणार नाही किंवा सुरू करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा चालविणार नाही.

१९८९ चा महा. २०.

(३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ अन्वये घटित केलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची मान्यता असलेली कोणतीही शिक्षण संस्था वगळता, कोणतीही व्यक्ती किंवा शिक्षण संस्था, महाराष्ट्र शासनाशी अगोदरच विचारविनिमय केल्याशिवाय, महाराष्ट्र राज्यात त्यांचे अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम किंवा कोणतेही अभ्यास केंद्र चालविणार नाही.

विवक्षित जाहिरातींना मनाई.

**४.** कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही शिक्षण संस्था, अशा शिक्षण संस्थेस किंवा अशा शिक्षण संस्थेमध्ये चालविण्यात येणाऱ्या अध्ययनक्रमास किंवा अभ्यास पाठ्यक्रमास समुचित प्राधिकरणाची मान्यता मिळालेली नाही हे तिला माहीत असताना किंवा त्याची तिला जाणीव असताना, तशी मान्यता मिळाली आहे अशी दुसऱ्या व्यक्तीची समजूत व्हावी या उद्देशाने त्या शिक्षण संस्थेत किंवा केंद्रात चालविण्यात येणाऱ्या अध्ययनक्रमाशी किंवा अभ्यास पाठ्यक्रमाशी संबंधित कोणतीही जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रदर्शित करणार नाही किंवा ती प्रसिद्ध किंवा प्रदर्शित करण्यास कारणीभूत ठरणार नाही, किंवा ती प्रसिद्ध किंवा प्रदर्शित करण्याची व्यवस्था करणार नाही किंवा त्यात भाग घेणार नाही.

## प्रकरण तीन

## प्राधिकारी

सक्षम प्राधिकारी.

**५.** शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी उपसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्याची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि विभिन्न शिक्षण संस्थांसाठी आणि विभिन्न अध्ययनक्रमांसाठी किंवा अभ्यास पाठ्यक्रमांसाठी विभिन्न अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

सक्षम प्राधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

**६.** (१) सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दाखल केलेल्या कोणत्याही तक्रारीच्या आधारे किंवा अन्यथा, कलम ३ च्या पोट-कलम (१) किंवा (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणतीही शिक्षण संस्था स्थापन केली आहे किंवा कोणताही अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम सुरू केला आहे किंवा चालविला जात आहे याबाबत त्याची खात्री पटल्यास, त्याला ताबडतोब अशी शिक्षण संस्था किंवा अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम बंद करण्याचा, आदेशाद्वारे निदेश देता येईल :

परंतु, अशा प्रकारे आदेश देण्यापूर्वी सक्षम प्राधिकारी, संबंधित व्यक्तीला किंवा शिक्षण संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अनधिकृत संस्था किंवा अनधिकृत अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम बंद करण्याचा निदेश देत असतेवेळी, सक्षम प्राधिकाऱ्यास, प्रवेशाच्या प्रयोजनार्थ घेतलेली फी व अशा अन्य रकमा किंवा आकार, ज्यांनी त्या संस्थेत अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रमाला प्रवेश घेतलेला असेल अशा विद्यार्थ्यांना परत करण्याचे निदेश अशा संस्थेला आणि अशा अध्ययनक्रमाचे किंवा पाठ्यक्रमाचे व्यवस्थापन करणाऱ्या प्रभारी व्यक्तींना देता येतील.

(३) तसेच, सक्षम प्राधिकारी, सर्वसामान्य लोकांनी किंवा विद्यार्थ्यांनी अशा संस्थांमध्ये किंवा अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रमाला प्रवेश घेणे टाळावे याकरिता म्हणून विस्तृत खप असलेल्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये आणि तसेच इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमांसह त्यास योग्य वाटेल अशा अन्य माध्यमांद्वारे त्या अनधिकृत संस्थांची किंवा अध्ययनक्रम किंवा अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रमांची नावे प्रसिद्ध करील किंवा प्रसिद्ध करवील.

(४) पोट-कलम (१) अन्वये अनधिकृत संस्था, अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम बंद करण्याच्या आदेशाव्यतिरिक्त, सक्षम प्राधिकाऱ्यास, जी संस्था अनधिकृत आहे किंवा जी अनधिकृत अध्ययनक्रम किंवा अनधिकृत पाठ्यक्रम प्रस्तुत करते अशा संस्थेवर आणि अशा संस्थेचे व्यवस्थापन करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीवर एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत असू शकेल इतकी शास्तीदेखील लादता येईल.

(५) सक्षम प्राधिकाऱ्यास, विहित करण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करता येईल आणि अशी अन्य कार्ये पार पाडता येतील.

(६) या अधिनियमाद्वारे सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार बजावताना आणि त्याची कर्तव्ये पार पाडताना, सक्षम प्राधिकारी, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील.

अपील प्राधिकारी.

**७.** शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी शासनाच्या उप-सचिवांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची अपील प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि विभिन्न शिक्षण संस्थांसाठी, अध्ययनक्रमांसाठी किंवा अभ्यास पाठ्यक्रमांसाठी विभिन्न अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

अपील.

**८.** (१) सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा शिक्षण संस्थेस, सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीच्या आत, अपील प्राधिकाऱ्यापुढे अपील दाखल करता येईल :

परंतु, अपीलकर्त्यास त्याच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे अपील दाखल करता आले नव्हते याबाबत अपील प्राधिकाऱ्याची खात्री पटल्यास, अपील प्राधिकाऱ्यास, पंधरा दिवसांचा उक्त कालावधी उलटून गेल्यानंतरही अपील दाखल करण्यात झालेला विलंब क्षमापित करता येईल.

(२) अपीलाचा निर्णय करताना, अपील प्राधिकारी, विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील.

(३) अपील प्राधिकाऱ्याचा अपिलावरील प्रत्येक आदेश किंवा निर्णय अंतिम असेल.

## प्रकरण चार

## अपराध व शास्ती

**९.** कलमे ३ आणि ४ यांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन हे अपराध ठरेल. अपराध.

**१०.** (१) कलम ३ च्या पोट-कलम (१) किंवा (२) यांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील. शिक्षा.

(२) जी व्यक्ती किंवा शिक्षण संस्था कलम ३ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदींचे उल्लंघन करील अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा शिक्षण संस्थेस, दोषसिद्धीनंतर, एक लाख रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(३) कलम ४ च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस किंवा शिक्षण संस्थेस, दोषसिद्धीनंतर, पन्नास हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु, एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

**११.** (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल त्याबाबतीत, असा अपराध घडला त्यावेळी जिच्याकडे कंपनीचा प्रभार होता आणि जी, कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनी देखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्वतोपरी प्रयत्न केले होते असे सिद्ध केल्यास, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल, आणि तो अपराध त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने अथवा मूकसंमतीने करण्यात आला आहे, किंवा त्यांनी कोणताही निष्काळजीपणा केल्यामुळे घडलेला आहे, असे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ते तद्नुसार कारवाई केली जाण्यास आणि शिक्षा दिली जाण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ किंवा व्यक्तींचा निकाय मग, तो विधिसंस्थापित असो किंवा नसो यांचा समावेश होईल ; आणि

(ख) "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेच्या संबंधातील त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींच्या कोणत्याही संघाच्या किंवा व्यक्तींच्या निकायाच्या संबंधातील अर्थ, त्याच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणारा कोणताही सदस्य, असा आहे.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

सक्षम प्राधिकारी व अपील प्राधिकारी यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

**१२.** सक्षम प्राधिकारी व अपील प्राधिकारी यांना या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयास, पुढील बाबींसंबंधातील दाव्याची न्यायचौकशी करताना, जे अधिकार निहित केलेले असतात तसेच अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(एक) तक्रारदार, शिक्षणसंस्थांचे विद्यार्थी व प्रतिनिधी यांना समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्यांची शपथेवर तपासणी करणे ;

(दोन) दस्ताऐवजांचा शोध घेण्यास आणि ते सादर करण्यास फर्माविणे ;

(तीन) प्रतिज्ञापत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(चार) भारतीय साक्षीपुरावा अधिनियमाची कलमे १२३ व १२४ च्या तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही कार्यालयाकडून कोणत्याही सार्वजनिक अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची किंवा अशा अभिलेखाच्या किंवा दस्तऐवजाच्या प्रतीची मागणी करणे ; १८७२ चा १.

(पाच) साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीकरिता आयोगपत्र काढणे ;

(सहा) आपल्या स्वत:च्या निर्णयांचे पुनर्विलोकन करणे ;

(सात) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

शिक्षण संस्था, अध्ययनक्रम किंवा अभ्यास पाठ्यक्रम यांसाठी जाहिरात संहिता असणे.

**१३.** (१) प्रत्येक शिक्षण संस्था, विहित केलेल्या जाहिरातीसंबंधीच्या स्वयंनियमनाकरिता भारतीय जाहिरात परिषदेने संहितेअन्वये आवश्यक केलेली स्वयंशिस्त अनुसरील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता शिक्षण संस्था, जाहिरात करताना पुढील मानकांचे अनुसरण करील :—

(एक) एखादी पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्र पाठ्यक्रमास कायद्यानुसार एखाद्या संस्थेची किंवा प्राधिकरणाची अधिस्वीकृती, मंजुरी, मान्यता किंवा पृष्ठांकन आवश्यक असेल अशी पदवी किंवा पदविका किंवा प्रमाणपत्रासंबंधीच्या पाठ्यक्रमाच्या जाहिरातीमध्ये जिने अधिस्वीकृती, मान्यता, मंजुरी किंवा पृष्ठांकन दिले असेल अशा संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे नाव विनिर्दिष्ट करील ;

(दोन) जाहिरात देणाऱ्या शिक्षण संस्थेच्या किंवा ज्याची जाहिरात प्रसिद्ध केली असेल अशा अध्ययनक्रमाच्या किंवा अभ्यास पाठ्यक्रमाच्या बाबतीत, ज्याच्या अधिस्वीकृतीची, मंजुरीची किंवा मान्यतेची गरज असेल अशा कोणत्याही प्राधिकरणाने अशी अधिस्वीकृती, मान्यता किंवा मंजुरी दिलेली नसेल, परंतु, जिने आवश्यक त्या प्राधिकरणाकडून अशी अधिस्वीकृती, मान्यता किंवा मंजुरी प्राप्त केली असेल अशा दुसऱ्या संस्थेशी ती संस्था संलग्न असेल तेव्हा, त्या जाहिरातीमध्ये जिच्याशी ती संस्था संलग्न असेल अशा शिक्षण संस्थेचे पूर्ण नाव व ठिकाण नमूद करील ;

(तीन) वरील खंड (दोन) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, ती शिक्षण संस्था दुसऱ्या शिक्षण संस्थेशी संलग्न असेल तेव्हा, मुद्रित तसेच श्राव्य किंवा दृकश्राव्य माध्यमाद्वारे जाहिरात देणाऱ्या अशा जाहिरातीमध्ये त्या शिक्षण संस्थेचे अक्षरटाईप व बोधचिन्ह, कोणतेही असल्यास, आणि तिची चित्राकृती प्रतिमा ही, जिच्याशी ती शिक्षण संस्था संलग्न असेल त्या शिक्षण संस्थेचे जसे अक्षरटाईप व बोधचिन्ह आणि चित्राकृती प्रतिमा असेल त्याप्रमाणेच असेल ;

(चार) जाहिरात देणारी व्यक्ती, अशा जाहिरातीतील आपला दावा सिद्ध करण्यास सक्षम असल्याखेरीज, त्या शिक्षण संस्थेत किंवा अध्ययनक्रमासाठी किंवा अभ्यास पाठ्यक्रमासाठी नावनोंदणी केल्याने विद्यार्थ्याला तात्पुरती किंवा कायमस्वरूपी नोकरी मिळेल, किंवा नोकरीमध्ये पदोन्नती किंवा वेतनवाढ मिळेल आणि तत्सम लाभ मिळतील अशी वाचकाची समजूत होईल अशा प्रकारे जाहिराती प्रदर्शित करणार नाही किंवा तसे सूचित करणार नाही ;

(पाच) जाहिरात देणारी व्यक्ती, अशा जाहिरातीमध्ये केलेले दावे सिद्ध करण्यास सक्षम असल्याखेरीज, तयार केलेल्या तुकडीची (बॅच) मर्यादा, विद्यार्थ्याला मिळालेले सर्वाधिक किंवा सरासरी गुण किंवा श्रेणी व दर्जा, इतर शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळणे, विद्यार्थ्यांची मतप्रदर्शने, विदेशी संस्थेशी संलग्नता आणि तत्सम बाबी यासंबंधातील कोणत्याही प्रकारचा कोणताही दावा जाहिरातीमध्ये करणार नाही ;

जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे शास्ती वसूल करणे.

**१४.** कलम ६ च्या पोट-कलम (४) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने आकारलेली शास्ती, सक्षम प्राधिकाऱ्याला प्रदान करण्यात आली नसेल तर, ती त्यास जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

प्रमाणपत्र पाठ्यक्रमांबाबतची व्यावृत्ती.

**१५.** कोणत्याही शिक्षण संस्थेला प्रमाणपत्र पाठ्यक्रम सुरू करता येईल :

परंतु, अशा प्रमाणपत्र पाठ्यक्रमाचे पारिभाषिक नामकरण हे, समुचित प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या पाठ्यक्रमासारखे असणार नाही.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१६.** या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही नियम, आदेश किंवा संलेख याअन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल सक्षम प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा अपील प्राधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

सक्षम प्राधिकारी इत्यादी हे लोकसेवक असणे.

**१७.** या अधिनियमान्वये नियुक्त केलेला प्रत्येक सक्षम प्राधिकारी व प्रत्येक अपील प्राधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

नियम करण्याचा अधिकार.

**१८.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) प्रथमच नियम केले असतील तेव्हा ती बाबखेरीज करून अन्य बाबतीत, या अधिनियमाखाली करण्यात येणारा प्रत्येक नियम पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असेल.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा आशयाचा निर्णय ते **राजपत्रात** प्रसिद्ध करतील तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाधा येणार नाही.

हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला पूरक असेल, परंतु न्यूनकारी ठरणार नाही.

**१९.** या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांच्या तरतुदींना पूरक असतील आणि त्यांना न्यूनकारी असणार नाहीत.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

**२०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करत असताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनास, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, त्याला आवश्यक व इष्ट वाटेल अशी, व या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

२०१३ चा महा. अध्या. १३. **२१.** (१) महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, २०१३ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे ; २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश किंवा करण्यात आलेली कोणतीही नियुक्ती यासह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, करण्यात आलेली नियुक्ती असल्याचे मानण्यात येईल.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते